रमाई आवास घरकुल (ग्रामीण)योजनेचा निधी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्याकडे वर्ग करण्याबाबत-

राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य
आवक क्रमांक - 6727
आवक दिनांक - 30/12/2016
शाखा - SO File
सहाय्यक संचालक (लेखा) उपसंचालक संचालक

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक रआयो-२०१६/प्र.क्र.६००/बांधकामे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ डिसेंबर, २०१६.

संदर्भ:- :- १) शासन निर्णय, सा.न्या.व वि.स.वि. समक्रमांक दि.३० सप्टेंबर २०१६.
२) शासन पत्र, सा.न्या.व वि.स.वि. समक्रमांक दि.१४ ऑक्टोबर २०१६

**प्रस्तावना :-**

राज्यात राबविण्यात येणाऱ्या इंदिरा आवास योजना या केंद्र पुरस्कृत योजनेसह सामाजिक न्याय विभागाची रमाई आवास योजना, आदिवासी विकास विभागाची शबरी आदिवासी घरकुल योजना व गृहनिर्माण विभागाची राजीव गांधी निवारा योजना क्र.१ व २ या राज्य पुरस्कृत ग्रामीण योजनांची प्रभावी अंमलबजावणी व संनियत्रण होण्यासाठी ग्राम विकास विभागाने राज्य व्यवस्थापन कक्ष- इंदिरा आवास योजनेची व्याप्ती वाढवून राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कक्षात रुपांतरीत करण्यास मान्यता दिली आहे.

प्रधान मंत्री आवास योजनेंतर्गतच्या लाभार्थी निवडीबाबतच्या मार्गदर्शक सूचना/ निकष विचारात घेऊन त्याअनुषंगाने रमाई आवास योजनेसाठी करावयाच्या लाभार्थी निकष/निवडीबाबतच्या सूचना संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये सुधारीत करण्यात आल्या आहेत तसेच संदर्भ क्र.2 येथील पत्रांन्वये रमाई आवास योजनेंतर्गत जिल्हानिहाय उद्दीष्ट कळविण्यात आले आहे. रमाई आवास योजना (ग्रामीण) चे निधी व्यवस्थापन राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्यामार्फत करण्यात येणार आहे.तदनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषद,महाराष्ट्र यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

3/1/17

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण द्वारे राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माणची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०१५-१६ पासून राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजना PFMS प्रणाली द्वारे राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने राज्य स्तरावर प्रत्येक योजनेसाठी एक स्वतंत्र योजनानिहाय केंद्रीय खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यात आले आहे. दिनांक १/०४/२०१६ नंतर मंजुर करण्यात आलेल्या राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेंतर्गतच्या लाभार्थ्यांना या खात्यामधून निधी सरळरित्या लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग होणार आहे.

[क्रु.मा.प.

त्या अनुषंगाने सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, घरकुलनिहाय आढावा घेऊन अपुर्ण घरकुले पुर्ण करण्यासाठी आवश्यक निधी जिल्हा स्तरावर ठेवून उर्वरित निधी राज्य व्यवस्थापन कक्षाच्या खालील खात्यावर वर्ग करण्याबाबत कार्यवाही करावी:-

| | |
|---|---|
| Bank Name | Punjab National Bank |
| Name of Account | RAMAI AWAS GHARKUL YOJNA |
| Account No. | 4138000101028206 |
| IFSC Code | PUNB0413800 |
| Branch name | NAVI MUMBAI C.B.D BELAPUR |
| Bank Add. Sector | 11, Plot no.29, C.B.D. BELAPUR - 400614 |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( जा.मा.गोसावी )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,महाराष्ट्र राज्य

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कक्ष, नवी मुंबई.
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.
आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
प्रादेशिक उपायुक्त, (सर्व) समाजकल्याण विभाग,
सहायक आयुक्त, (सर्व) समाजकल्याण विभाग.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १ / २, मुंबई/नागपूर
वित्त विभाग (व्यय-१४/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,महाराष्ट्र राज्य
निवडनस्ती (बांधकामे)



--------